# मच्छर

मच्छर म्हणा मॉस्कुटो म्हणा, म्हणा कुणी डास
अंधारसाम्राज्याच्या वैभवातून येतो आम्ही खास
वाहते पाणी नको आम्हा हवे डबके, साचले पाणी
प्रेमाने वाढले, राहिले नांदले कचऱ्याच्याच ठिकाणी ।
जीव जरी लहान तरी खोड्या आमच्या महान
म्हणूनच म्हणवून घेतो आम्ही संध्याकाळचे डॉन
कीटकवर्गीय आम्ही संध्याकाळी थव्यांनी निघतो जोमान
रक्त आवडे आम्हा म्हणून चावे घेऊन करतो हैराण ।
कोपर, घोटा, उघडे जे अंग, चावून चावून करतो तंग
घेऊन तरीही आमची दखल, टाळ वाजवीत तुम्ही होता दंग
रक्त पिऊन टुम्म होऊन घेतो सर्वांची मजा
घाबरता जेव्हा तुम्ही लावता ऑलआऊट किंवा कछुवा ।
हिवताप, मलेरिया, डेंग्यू हे तर आमचे प्रॉडक्ट
त्यासाठी घेतो आम्ही अथक परिश्रम
खूप प्रयत्न करूनही आम्ही लवकर संपत नाही
मजेत फिरतो गात आम्ही आमच्याच मस्तीत ।
सफाई मोहिमेची चाहूल लागता
छु मंतर होतो सुरक्षित ठिकाणी
छोटा किटक असूनही तुम्हा करतो सळो कि पळो
ह्याचा प्रत्यय प्रत्येकास येतो क्षणोक्षणी ।
हवा आहे आमची कैसी ती थांबणारच निघाले स्वारी
आमचे जीवन आमचे गुणगुणणे
कोण म्हणे हे डासांचे गाणे.....
कोण म्हणे हे डासांचे गाणे......? ॥

सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे
अमरावती